**“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद” योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.**

सन २०२३-२४ साठी (लेखाशिर्ष (२२१७ ०९१३) अंतर्गत
ठाणे महानगरपालिका जि. ठाणे करिता
रक्कम रू.५५.०० कोटी
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका जि. ठाणे करिता
रक्कम रु. १०.०० कोटी
(एकुण रक्कम रु. ६५.०० कोटी)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- मनपा-२०२३/प्र.क्र.२४५/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- २५ एप्रिल, २०२३**

**संदर्भ :-**

(१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दिनांक १२ डिसेंबर,२०१७.

(२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.९६/नवि-१६, दिनांक ३० सप्टेंबर,२०२०.

(३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक १२ एप्रिल,२०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील महानगरपालिकांना मुलभुत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कामांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

“महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद” या योजनेंतर्गत (१) **ठाणे महानगरपालिका जि. ठाणे करिता रक्कम रू.५५.०० कोटी (२) कल्याण - डोंबिवली महानगरपालिका जि. ठाणे करिता रक्कम रु. १०.०० कोटी असे एकुण रक्कम रुपये ६५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पासष्ठ कोटी मात्र)** इतका निधी वितरीत करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्पाअंतर्गतची कार्यान्वयन यंत्रणा संबंधित **“महानगरपालिका”** राहील.

३. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहील. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना प्रकल्प खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व

संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

४. सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे.सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्चः विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वियन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१२. या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, ठाणे यांना नियंत्रक अधिकारी तसेच, जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, ठाणे / जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे यांनी सदरचा निधी कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासाठी विशेष तरतूद" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तींची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

१५. या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करुन नये.

१६. सदरचे अनुदान दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. दिनांक ३१ मार्च २०२५ अखेरचा अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

१७. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा.

१८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२१ व दि.२८ मार्च,२०२२ अन्वये कार्यवाही करावी.

१९. यासंबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-५, मुख्य लेखाशिर्ष ४२१७, नगर विकासावरील भांडवली खर्च, ८०, सर्वसाधारण,१९१, स्थानिक संस्था,महानगरपालिका, नगर विकास प्राधिकरणे, शहर सुधार मंडळे, इत्यादींना सहाय्य, (००) (०२) महागनरपालिका क्षेत्रात मुलभूत सुखसोयींच्या विकासासाठी विशेष तरतूद (कार्यक्रम), (२२१७ ०९१३), ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ मधील मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

२०. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२ एप्रिल,२०२३ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अ.क्र.९ मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

२१. संदर्भाधीन क्र. (१), (२) व (३) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२५/४/२३

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

२. विभागीय आयुक्त, कोकण
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
४. जिल्हाधिकारी, ठाणे
५. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, जि.ठाणे
६. आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका जि. ठाणे
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१२. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
१३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे
१५. जिल्हा प्रशासन अधिकारी, ठाणे
१६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांकः- मनपा-२०२३/प्र.क्र.२४५/नवि-१६

## दिनांक २५ एप्रिल, २०२३ सोबतचे विवरणपत्र

## ठाणे / कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील मुरादभाई सोलापूरकर गल्ली, परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| २ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील जय तुळजाभवानी चाळ, परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| ३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथे महिला शौचालय परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| ४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथे विश्वकर्मा चाळ परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| ५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथे वखार चाळ मागील शंकर मंदिर परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| ६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथे मज्जीद चाळ परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| ७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील लोहार चाळ परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | २०.०० |
| ८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील चाळ क्र.२०,२५, व २६ परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | ३०.०० |
| ९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील चाळ क्र.३३,३४,३५ परिसरात कॉंक्रिटीकरण करणे व मुलभूत पायासुविधा पुरविणे. | ३०.०० |
| १० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील भागात चौक सुशोभीकरण करणे. | ५०.०० |
| ११ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. ०९ "अ" मधील महात्मा फुले नगर, येथील खाडी लगत बौद्धविहार ते वखार पर्यंत संरक्षण भिंत बांधणे. | ५०.०० |
| १२ | प्रभाग क्र. ९ मध्ये पारसिकनगर येथे किशोर पार्क ते विरत कॉम्पलेक्स रस्त्याकडे व शंकर पार्क परिसरात सी.सी. रस्ते व पायवाट तयार करणे. | ७५.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| १३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील पारसिक नगर, येथील ९० फिट रस्त्यालगत जेष्ठ नागरिक विश्रांती कट्टा बनविणे. | २५.०० |
| १४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील खारीगाव व पारसिक नगर येथे विविध ठिकाणी कामे करणे. | ३५.०० |
| १५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील वास्तू आनंद गेट, ते रेतीबंदर सर्कल पर्यंत, जुना मुंबई पुणे रस्त्यावर एल.इ.डी.दिवे बदली करणे | १५.०० |
| १६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील पारसिक नगर येथे चावंडाय कॉम्प्लेक्स परिसरात कॉंक्रिटीकरण व पायवाट करणे. | ५०.०० |
| १७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील पारसिक नगर, येथील ९० फिट रोड, येथील शुभ तेज बिल्डींग, व आर जे २२ येथील, खुला रंगमंच परिसरात जाणाऱ्या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण व सुशोभिकरण करणे. | १००.०० |
| १८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२४ -ब॰ मधील कळवा पूर्व येथील अशोक सम्राट नगर, येथील समाज मंदिराची पुर्नबांधणी करणे. | ५०.०० |
| १९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२४ -ब॰ येथील विटावा मैदानामधील खुला रंगमंच व लायब्रेरी येथे विविध कामे करणे. | ५०.०० |
| २० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२४ -ब॰ येथील विटावा येथे रमेश जोमा पाटील ते विठ्ठल मंदिर पर्यंत रस्ता सी.सी. करणे. | ५०.०० |
| २१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२४ -ब॰ येथील जुने रेशनिंग दुकान ते सुभाष पाटील यांचे घरापर्यंत रस्ता तयार करणे. | ५०.०० |
| २२ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२४ -ब॰ येथील मार्तंड ते यमुनाबाई परशुराम ते लकी हाउस पर्यंत जलवाहिनी टाकणे. | ५०.०० |
| २३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२४ -ब॰ येथील कोळीवाडा येथील गावातील रस्ते स्टॅप कॉक्रीट करणे. | ५०.०० |
| २४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील पारसिकनगर परिसरात ९० फिट रोड येथे शौचालय व पाणपोई बांधणे. | २५.०० |
| २५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील पारसिकनगर परिसरात नाट्यगृहासाठी असलेला आरक्षित भूखंडावर उद्यान विकसित करणे. | ५०.०० |
| २६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील स्वामी समर्थ मठ ते ओमकार सोसायटी पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे,आणि स्वामी समर्थ मठ ते नाशिक १९ हायवे येथील रस्त्याच्या डीव्हायडर येथे झाडे लाऊन सुशोभीकरण करणे. | ५०.०० |
| २७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील खारीगाव परिसरातील, विठ्ठल मंदिर ते साई विहार सोसायटी पर्यंत कॉंक्रिटीकरण करणे. | ७५.०० |
| २८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील खारीगाव परिसरातील काशिनाथ पाटील मार्ग, ते पारसिक बँक येथील चौकाचे सुशोभीकरण करणे. | २५.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| २९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील खारीगाव परिसरातील ठाणे महानगरपालिका, मराठी शाळेजवळील चौकाचे सुशोभिकरण करणे. | २५.०० |
| ३० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ पारसिक नगर परिसरातील रिलायन्स, केशव हाईट्स, नंदनवन सोसायटी तसेच नेचर ग्लोरी परिसरातील चौकांचें सुशोभीकरण करणे. | २०.०० |
| ३१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ येथे हिंदूरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडानगरी मैदानमध्ये हायमास्ट बसविणे. | १०.०० |
| ३२ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ येथील मराठी शाळेजवळील चौक दिशादर्शक फलक सुशोभीकरण करणे. | २०.०० |
| ३३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भालेश्वर मित्र मंडळ ते पिंपळेश्वर मंदिर परिसरात ०६ इंची जलवाहिनी टाकणे, व सदर परिसरात गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ३४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील गणेश मित्र मंडळ, घोलाई नगर येथे ०६ इंच जलवाहिनी टाकणे, व सदर परिसरात गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ३५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आत्कोनेश्वर नगर व पौंडपाडा परिसरात विविध ठिकाणी गटार व पायवाट तयार करणे. | ५०.०० |
| ३६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील गजानन मित्र मंडळ ते कालिकामाता मित्र मंडळ येथे रस्त्याचे कॉंक्रीटकरण करणे. | २५.०० |
| ३७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी विभाग येथे पायवाट व गटार करणे. | २५.०० |
| ३८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आत्कोनेश्वर नाका ते शिवसेना शाखा धर्मवीर मित्र मंडळ पर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे. | २५.०० |
| ३९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील महादेव चाळ ते श्रमिक सोसायटी पर्यंत पायवाट व गटार करणे. | २५.०० |
| ४० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भास्कर नगर येथे नवजीवन चाळ परिसरामध्ये पायवाट व गटार करणे. | २५.०० |
| ४१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मज्जीद येथील पौंडपाडा परिसरात गटार व पायवाट करणे. | ३०.०० |
| ४२ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आत्कोनेश्वर नगर येथे शिवशाही मित्र मंडळ येथे शौचालय बांधणे. | १५.०० |
| ४३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील शिवशक्ती नगर येथे पायवाट व गटार करणे. | ३०.०० |
| ४४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील, खारीगाव दत्तवाडी येथे स्वामी समर्थ मठ शेजारील, परिसरात नागरिकांसाठी स्व.कै.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह बांधणे. | २००.०० |
| ४५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील, खारीगाव गणेश विद्यालय शेजारी बांधण्यात येणाऱ्या आरोग्य केंद्राचे बांधकाम करणे. | ५०.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ४६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील, खारीगाव हिरादेवी मंदिर परिसरात, देवकीनंदन बसस्टॉप ऑफिस समोर, रविंद्र हॉटेल व पारसिक नगर अशा ठिकाणी हायमास्ट व विद्युत पथ दिवे लावणे. | २५.०० |
| ४७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.०९ मधील, कुणाल सोसायटी, व यमनी श्रीयोग सोसायटी, परिसरात गटार व काँक्रिटीकरण करणे. | २५.०० |
| ४८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २४ -ड॰ मधील, विटावा सूर्यनगर एकविरा आई मंदिर रोड, नवीन लक्ष्मी विद्यालय जवळ, विटावा जकात नाका, शंकर मंदिर ते जय भगवान कॉलेज, विघ्नहर्ता सोसायटी व समर्थ कृपा चाळ परिसरात काँक्रीटीकरण करणे. | १००.०० |
| ४९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २४ -ड॰ मधील, विटावा सूर्यनगर साई वंदना, साई ईश्वर, श्री समर्थकृपा, शनिवार पार्क, गणपती पाडा परिसरात गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ५० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कळवा प्रभाग समिती अंतर्गत विटावा येथील मार्तंड अपार्टमेंट ते सुमनाई विद्यालय, आणि विटावा नाका ते बाळाराम पाटील चौक परिसरात १०० मी.मी. व्यासाची डी.आय.जलवाहिनी टाकणे. | ५०.०० |
| ५१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २४ -ड॰ मधील, वाघोबानगर सेंट अग्रेसन स्कूल ते सचिन म्हात्रे ऑफिस पर्यंत, अजय रामभोर, गल्ली एकता चाळ, महालक्ष्मी चाळ, गायत्री चाळ, छोटा दुर्गा मंदिर ते हनुमान मंदिर, सुरेश जैस्वाल घर, गायकर मैदान, मोठा दुर्गा मंदिर परिसरात गटार व पायवाट बनविणे, व नाल्यावर लोखंडी ब्रिज बसवणे. | १००.०० |
| ५२ | सम्राट अशोक नगर कळवा (पूर्व )येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे समाज मंदिर बनवणे. | ३५.०० |
| ५३ | न्यू शिवाजी नगर कळवा पूर्व येथील तलावाचे सुशोभिकरण करणे. | २५.०० |
| ५४ | कळवा रेल्वे स्थानक पूर्व येथे शौचालय बांधणे. | २०.०० |
| ५५ | सहकार विद्या प्रसारक मंडळ कळवा पश्चिम कावेरी शेतू येथे विश्रांती शेड बनवणे. | २०.०० |
| ५६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २५ मधील, पौंड पाडा श्रमिक सोसायटी चाळ, येथे शौचालय नुतनीकरण करणे. | २०.०० |
| ५७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २५ मधील,झरणा चाळ येथे मोठा नाला बांधून बंदिस्त करणे. | ३०.०० |
| ५८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २५ मधील,झरणा चाळ येथे गटार व पायवाट तयार करणे. | २०.०० |
| ५९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र. क्र. २५ मधील, जानकी रामा साळवी, गेट नं ०१ मनीषा नगर येथे व्यवस्था बैठक करणे. | ३०.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ६० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कळवा परिसरातील संत निरंकारी भवन नुतनीकरण करणे. | ५०.०० |
| ६१ | कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील रेल्वे कॉलनीमधील नाला बंदिस्त करून बांधकाम करणे. | ५०.०० |
| ६२ | प्रभाग क्र. ९ खारीगाव मधील संजोग सोसायटी परिसरात रस्ते व नाली तयार करणे. | २५.०० |
| ६३ | प्रभाग क्र. ९ खारीगाव नाका येथे कमान (दिशा दर्शक फलक) सुशोभीकरण करणे. | २५.०० |
| ६४ | प्रभाग क्र. ९ खारीगाव मधील साईनगर, अभिषेक चाळ, लक्ष्मीबुबेरा चाळ व शनीमंदिर परिसरात गटार व पायवाट तयार करणे. | २५.०० |
| ६५ | प्रभाग क्र. ९ खारीगाव मध्ये आसन व्यवस्था व इतर स्थापत्य कामे करणे. | २५.०० |
| ६६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अधिकार चौक ते गावदेवी मंदिर पर्यंत रस्ता सी.सी. करणे. | १००.०० |
| ६७ | मार्तंड अपार्टमेंट ते बळीराम अपार्टमेंट पर्यंत युटीडब्ल्यूटी पद्धतीने रस्ता तयार करणे. | २५.०० |
| ६८ | अपूर्वा अपार्टमेंट व जवळील परिसरात सी.सी. रस्ते तयार करणे. | २५.०० |
| ६९ | नारायण निवास ते साई नगर परिसरात सी.सी. रस्ते तयार करणे. | ५०.०० |
| ७० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील रोशनी अपार्टमेंट ए.बी.सी.डी. ते उदय नगर साईबाबा मंदिर पर्यंत गटार व पायवाट करणे. | ५०.०० |
| ७१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील आनंद सोसायटी ते हनुमान नगर घाटीपाडा व बुद्ध विहार परिसरात गटार व पायवाट करणे. | ५०.०० |
| ७२ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील ठाकूरपाडा येथील कृष्णा पॅलेस, ताहेरा महल, के.जी.एन. अपार्टमेंट विशाखा अपार्टमेंट, कोकण नागरी बिल्डींग पर्यंत गटार व पायवाट करणे. | ५०.०० |
| ७३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील ठाकूरपाडा रोशनी महल, नुरानी बिल्डींग, साईधाम बिल्डींग, गाडगिफ्ट बिल्डींग, रवी किरण बिल्डींग इत्यादी परिसरात गटार व पायवाट करणे. | ५०.०० |
| ७४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ “ड” मधील कौसा गावात विविध ठिकाणी UTWT पद्धतीने रस्ता तयार करणे. | ५०.०० |
| ७५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ “ड” मधील बिलाल पार्क परिसरात UTWT पद्धतीने रस्ता तयार करणे. | ३५.०० |
| ७६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ “ड” मधील साजीया बिल्डींग आणि सैनिक नगर परिसरात UTWT पद्धतीने रस्ता तयार करणे. | १५.०० |
| ७७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ “ड” मधील वफा मज्जीद ते प्राईम बिल्डींग पर्यंत फुटपाथ तयार करणे. | २५.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ७८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "ड" मधील शामीन अपार्टमेंट ते न्यू शामीन अपार्टमेंट, मोतीबाग परिसरात UTWT पद्धतीने रस्ता तयार करणे. | ५०.०० |
| ७९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "ड" मधील जमाल चाळ येथे UTWT पद्धतीने रस्ता तयार करणे. | २५.०० |
| ८० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "ड" खरवली देवी मंदिर ते मुख्य रस्त्या पर्यंत रस्ता कॉंक्रीटी कारण करणे. | १००.०० |
| ८१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "अ" मधील रशीद कंपाऊंड येथील तोफा चाळ, ए.बी.सी.रुबी चाळ, ए.बी.सी.मज्जीद चाळ ए.बी.सी.येथे पायवाट व गटार बनविणे. | ५०.०० |
| ८२ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "अ" मधील चणींपाडा येथे पायवाट व गटार बनविणे. | ५०.०० |
| ८३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "अ" मधील रशीद मुल्ला चाळ ए ते झेड परिसरात पायवाट व गटार बनविणे. | ५०.०० |
| ८४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "अ" मधील अम्मार कॉलनी ए.बी.सी.डी.परिसरात पायवाट व गटार बनविणे. | ५०.०० |
| ८५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "अ" मधील गुलमोहर कंपाऊंड परिसरात पायवाट व गटार बनविणे. | ५०.०० |
| ८६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३३ "अ" मधील बेहमन कॉम्प्लेक्स येथे यु.टी.डब्लू.टी. रस्ता बनविणे. | ५०.०० |
| ८७ | मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.३१ मधील आलिशान रोड येथे यु.टी.डब्लू.टी. पद्धतीने रस्ता बनविणे. | ५०.०० |
| ८८ | मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.३१ मधील शाहू नगर येथे यु.टी.डब्लू.टी. पद्धतीने रस्ता बनविणे. | ५०.०० |
| ८९ | मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.३१ मधील श्री शंकर मंदिर तलावाचे सुशोभीकरण करणे. | १००.०० |
| ९० | मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत प्र.क्र.३१ मधील शंकर मंदिर येथे अस्तित्वातील असलेले गार्डन सुशोभीकरण करणे. | १००.०० |
| ९१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील गीते चाळ येथील गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ९२ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील जे.पी.सोसायटी येथील गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ९३ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील हनुमान नगर येथील विविध ठिकाणी गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ९४ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील घाटी पाडा येथील गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ९५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील सम्राट नगर येथे विविध ठिकाणी गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ९६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३१ मधील संजय नगर येथील विविध ठिकाणी गटार व पायवाट बनविणे. | ५०.०० |
| ९७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२६ "ड"मधील दत्तवाडी येथील नाल्याची पुर्नबांधणी करणे. | ५०.०० |
| ९८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२६ "ड" मधील संतोष नगर येथील नाल्याची पुर्नबांधणी करणे. | ५०.०० |
| ९९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२६ "ड" मधील नोबल हाउस नाल्याची पुर्नबांधणी करणे. | ४०.०० |
| १०० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२६ "ड" मधील विनय सोसायटी तसेच लगतच्या जळगावंकर हिरा पन्ना अरिहंत, सुंदरम बिल्डींग परिसरात, कॉंक्रिटीकरण करणे. | ६०.०० |
| १०१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.२६ "ड" मधील बॉम्बे कॉलनी परिसरात विविध ठिकाणी कॉंक्रिटीकरण करणे. | ९५.०० |
| १०२ | मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.२६ मधील मुंब्रा येथील खडी मशीन ते शिवाजी नगर पर्यंत मिसिंक लिंक तयार करणे. | ९५.०० |
| १०३ | मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातील प्र.क्र.२६ मधील पाटील वाडी येथील परिसरात यु.टी.डब्लू.टी. पद्धतीने रस्ता तयार करणे. | १००.०० |
| १०४ | मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रा मध्ये रुपेश निवास ते कैवल्य शाळे पर्यंत रस्ता रुंदीकरण करणे. | १००.०० |
| १०५ | रेतीबंदर, मुंब्रा दिगंबर सेठ घरापासून ते कैवल्य शाळेपर्यंत दोन्ही बाजूची गटार बांधकाम करणे. | १५.०० |
| १०६ | रेतीबंदर, मुंब्रा फुलसे निवास ते आदिवासी कॉलनी पर्यंत गटर पायवाट करणे. | १५.०० |
| १०७ | रेतीबंदर, मुंब्रा फुलसे निवास ते आदिवासी कॉलनी पर्यंत घट पायवाट करणे. | १५.०० |
| १०८ | रेतीबंदर, मुंब्रा रेतीबंदर मुंब्रा येथील अटलांटा ब्रिज खाली ओपन जिम तयार करणे. | १५.०० |
| १०९ | रेतीबंदर १ येथील गुरुद्द्वार चे सुशोभीकरण करणे. | ५०.०० |
| ११० | तीबंदर विभागातील वागरी समाजाचे (रखा दादा मंदिर)जिर्णोदर करणे. | ५०.०० |
| १११ | अमृतांगन सोसायटी टॉवर नं ४ पार्सिकनगर येथे कॉंक्रिटीकरण करणे | ५०.०० |
| ११२ | रेतीबंदर नवीन उड्डाण पुलशेजारी प्राचीन कालीन गणपती मंदिराचे जीर्णोद्धार करणे. | ५०.०० |

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रु. (लक्ष) |
|---|---|---|
| ११३ | मुंब्रा येथील मच्छीबाजार दुरुस्त व सुशोभीकरण करणे. | ५०.०० |
| ११४ | मुंब्रादेवी रोड ते दत्तवाडी पर्यंत फूटपाथला लोंखंडाचे रेलिंग व सुशोभीकरण करणे. | ५०.०० |
| ११५ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील रिजवान मामा इमारती लगत पायवाट तयार करणे. | ५०.०० |
| ११६ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील टायटानिक इमारत लगत गटाराचे नुतनीकरण करणे. | ४०.०० |
| ११७ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील धुम परिसरातील गटार व पायवाट करणे. | ५०.०० |
| ११८ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील कदर पॅलेस परिसरातील गटार व पायवाट करणे. | ५०.०० |
| ११९ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील हर्मियन टॉवर लगत गटार व पायवाट करणे. | ६०.०० |
| १२० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील एम.एस.कॉलेज परिसरातील गटार व पायवाट करणे. | ३०.०० |
| १२१ | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.३० ड मधील ग्रिन व्हिव लगत गटाराची नुतनीकरण करणे. | २०.०० |
| १२२ | आलम मेहत ते आयशा मंजिल पर्यंत गटार व पायवाट तयार करणेs. | १५.०० |
| १२३ | मजीदा ते रजनी अपार्टमेंट पर्यंत गटार व पायवाट तयार करणे. | १५.०० |
| १२४ | हाजी उमर मंजिल ते गरीब नवाज चाळ पर्यंत गटार व पायवाट तयार करणे | १०.०० |
| १२५ | सहारा अपार्टमेंट ते गौसिया अपार्टमेंट पर्यंत गटार व पायवाट तयार करणे. | १०.०० |
| १२६ | कळवा प्रभाग समिती अंतर्गत छत्रपती शिवाजी रुग्णालय शेजारील अयप्पा मंदिर येथील संरक्षण भिंत व स्थापित्य कामे करणे | २५.०० |
| १२७ | अष्टविनायक सोसायटी व पौंडपाडा परिसरात सी.सी. गटार व पायवाट तयार करणे. | २५.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **५५००.००** |

| **कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कामे** | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामांची नावे** | **रक्कम रु. (लक्ष)** |
| १ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील आयरे गाव येथे नानासाहेब धर्माधिकारी सामाजिक सभागृह उभारणे. | ३००.०० |
| २ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली पूर्वेतील ९० फुटी रोड लगत उद्यानाकरिता आरक्षित असलेल्या भूखंडावर उद्यान विकसित करणे. | ५०.०० |
| ३ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नेतिवली सि.स.नं. २ सुविधा भूखंड ५१११.१५ चू.मी. क्षेत्रापैकी उपलब्ध भूखंडावर हिंदी भाषा भवन व मराठा भवन उभारणे. | ५००.०० |
| ४ | कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील डोंबिवली पूर्व घरडा सर्कल येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारणे. | १५०.०० |
| | **एकुण रक्कम रु. (लक्ष)** | **१०००.००** |